देशोन्नती

# नांदेड जिल्ह्यात शौचालय बांधकामाचा १ लाखाचा पल्ला

## ७०० ग्रामपंचायती झाल्या हगणदारी मुक्त

**प्रतिनिधी/ ९ नोव्हेंबर**

**नांदेड :** स्वच्छ भारत मिशन ग्रामीण अंतर्गत राज्यात शौचालय बांधकामासाठी विविध उपक्रम हाती घेण्यात आले असून नांदेड जिल्ह्यातील चालू वर्षातील १ लाख ४८ शौचालयाचे बांधकाम पुर्ण झाल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक शिनगारे यांनी दिली आहे.

शौचालय बांधकामासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक शिनगारे यांनी सुरूवातील पंचायत समिती स्तरावर आढावा बैठका घेतल्या. गावस्तरावर शौचालयाची पाहणी करुन ग्रामस्?थांशी संवाद साधला. कंधार तालुक्यातील काटकळंबा गावात मुख्य कार्यकारी अधिकारी शिनगारे यांनी प्रत्यक्ष शौचालय बांधून या मोहिमेला चळवळीचे स्वरुप प्राप्त करुन दिले. त्यानंतर मिशन मोडमध्ये उपक्रम राबविल्यामुळेच चालू वर्षात आतापर्यंत १ लाख ४८ हजार शौचालयाचे बांधकाम पुर्ण झाले आहेत. सुरूवातीला ५० पर्यंत शौचालय बांधकाम करावयाच्या १८१ गावासाठी मिशन १८१ त्यानंतर ७५ शौचालय बांधकाम करावयाच्या १५५ ग्राम पंचायतीसाठी फास्ट ट्रॅक ७५ हे उपक्रम यशस्वी झाल्यानंतर १३ तालुक्यातील मोठया ग्राम पंचायतीमधून १३० ग्राम पंचायतीसाठी मिशन दस अश्वमेध, एप्रिल ते ऑक?टोंबर या कालावधीत एकही शौचालय बांधकाम



न केलेल्या ८८ ग्राम पंचायतीमध्ये फोर्स फिनिक्स आणि १०० शौचालय बांधकाम करावयाच्या ९० ग्राम पंचायतीमधून मिशन फास्ट ट्रॅक १०० हे उपक्रम राबविले जात आहेत. यामधून जिल्ह्यातील अर्धापूर, मुदखेड, धर्माबाद व माहूर हे चार तालुके हागणदारीमुक्त झाली आहेत. या तालुक्यातील समापती व गट विकास अधिकारी यांचा सर्व साधारण समेत सत्कारही करण्यात आला आहे. आतापर्यंत बांधण्यात आलेल्या १ लाख ४८ हजार शौचालय बांधकामात भोकर तालुक्यात ४ हजार ७७७ शौचालये बांधण्यात आली आहेत. बिलोली- ५ हजार २८२, देगलूर - ६ हजार १४९, धर्माबाद - ३ हजार ६००, हदगाव- १४ हजार ७२४, हिमायतनगर- ७ हजार ६०८, कंधार- ८ हजार ८१, किनवट- ९ हजार ७८५, लोहा- ७ हजार ५८३, माहूर- ७ हजार २९१, माहूर- ७ हजार २९१, मुदखेड- २ हजार ४७०, मुखेड- ६ हजार ७०७, नायगाव- ४ हजार ७४९, नांदेड- ७ हजार ४०७ तर उमरी तालुक्यात ३ हजार ८२९ असे एकूण १ लाख ४८ शौचालय बांधण्यात आली आहेत. येत्या मार्च अखेर संपूर्ण जिल्हा हागणदारीमुक्त करण्याचा संकल्प जिल्हा परिषदेने केला आहे, अशी माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक शिनगारे यांनी दिली आहे.

आजूनही जिल्ह्यात सुमारे एक लाख शौचालय बांधकाम करायचे शिल्लक आहे. हे काम करण्याचे देखिल जिल्ह्यातील पदाधिकारी व आधिकाऱ्यांनी सहकार्य करून जिल्हा हागणदारीमुक्त करण्यासाठी आपले योगदान द्यावे असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक शिनगारे यांनी व्यक्त केले आहे.

नांदेड जिल्ह्यात शौचालय बांधकामासाठी जिल्ह्यातील खासदार, आमदार, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा, उपाध्यक्ष, जिल्हा परिषद सदस्य, सर्व खात्याचे सभापती, लोकप्रतिनधी, पंचायत समितीचे सभापती, उपसभापती, सदस्य, जिल्ह्यातील ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच सदस्य, जिल्हा परिषदचे खाते प्रमुख, जिल्ह्यातील सर्व अधिकारी, कर्मचारी, विस्तार अधिकारी, ग्राम विकास अधिकारी, ग्रामसेवक व गावातील नागरीक यांचा प्रतिसाद मिळाल्यामुळेच नांदेड जिल्ह्यात स्वच्छ भारत मिशन अंतर्गत गावांचा कायापालट होत आहे.

**- अशोक शिनगारे, सीईओं जि. प.**